# वस्त्र

गणेश विमल महादू सानप



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# वस्त्र

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

**आमचं काहीच कमी होत नाही.**

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

**आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# 'वस्त्र'

# 'वस्त्र'

## लेखक : गणेश विमल महादू सानप

## 'वस्त्र'

**लेखक**

गणेश विमल महादू सानप

मु. कऱ्हे पो. निमोण ता. संगमनेर जि. अ. नगर ४२२६११

९५९४६०७३९२

ganeshsanap1987@gmail.com

aadarsha.blogspot.com

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ ब वर्ग (लेखक) सभासद क्र. ३७०९०

**प्रकाशक :-**

इ-साहित्य प्रतिष्ठान

न

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १८ जानेवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## याआधी प्रकाशित

### पुस्तक

- **बर्फी?** (मुलगा आणि मुलगी भेदभाव नसावा)
- **जगायचं कुणासाठी?** (शेतकरी आत्महत्या थांबाव्यात)

### लघुपट

- **बर्फी?**
- **जगायचं कुणासाठी?**
- **Independence Day After Long Time**
- **‘अंतर्वस्त्र’**

### चित्रपट कथा-पटकथा

- **फीदंरी**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनरमुद्रण, नाट्य, चित्रपट अथवा इतर ठिकाणी रूपांतरित करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

या कथेतील सर्व स्थळ, पात्र, आणि प्रसंग काल्पनिक आहेत. या कथेचा आणि पात्रांचा कुठल्याही घटनेशी संबंध आला तर तो निव्वळ योगा योग समजावा.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**नमस्कार,**



'जगायचं कुणासाठी' आणि 'बर्फी' या पुस्तकांबद्दल अनेक स्तरातून प्रतिक्रिया मिळाल्या मला खूपच आनंद झाला. मी जे मांडतोय ते तुम्हाला आवडतंय, पटतंय याची ही पावती आहे. त्याच बरोबर माझ्या काही चुका लक्षात आणून दिल्या, त्या मी मान्य करून एक पाऊल पुढे सरकताना नक्कीच त्यात सुधारणा करेल. माझं तिसरं पुस्तक तुमच्या हातात देताना मला अजूनच आनंद होत आहे. तुम्हा सर्व वाचकांचे मिळालेले प्रेम असंच माझ्यावर राहो हीच ईच्छा. माझ्या जीवनात किंवा माझ्या आजूबाजूला ज्या घटना घडतात. त्यांचा परिणाम माझ्या जीवणार काही प्रमाणात नसेल हि पडत परंतु समाजातील काही घटकांवर याचा नक्कीच परिणाम पडतोय. त्यातूनच मी व्यक्त होत असतो. माझ्याकडून काही चुका होत असतील तर नक्की कळवा. खोटी प्रशंसा समोरच्याला अधोगतीच्या मार्गावर ढकलत असते, पण वेळेवर एखाद्याची चूक लक्षात आणून दिली तर नक्कीच त्याच्या यशाजवळ पोहचण्यास त्याला मदत होईल. हेहि तितकंच महत्वाच आहे.

इ-साहित्य आणि सर्व टीमचे मनापासून खूप-खूप धन्यवाद.

**धन्यवाद,**

**गणेश विमल महादू सानप**

## पुस्तकाबद्दल थोडक्यात

येथे मी सीमा नावाच्या मुलीच्या जीवनातील काही प्रसंग मांडत आहे. आजूबाजूच्या काही वाईट नजरांचा तिच्या मनावर काय परिणाम होतो. तिच्या वस्त्रांमुळे तिला कसं  शारीरिक आजाराला तोंड द्यावं लागतं. आणि या सर्व प्रकारातून तिला एक कल्पना सुचते, ती कल्पना अमलात आणते तर त्याचे सकारात्मक परिणाम तिला दिसून येतात.

हि कथा काल्पनिक आहे. त्याचबरोबर सीमाने जी कल्पना अमलात आणली ती योग्यच असेल असेही नाही. किंवा तो त्यावरील उपाय नसेलही.

# ‘बर्फी’ बद्दल थोडंसं

**Pankaja Gopinath Munde**

31 mins •

वरळी कार्यालयात गणेश विमल महादू सानप लिखीत 'बर्फी' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. समाजात स्त्री जन्माचे स्वागत व्हावे, मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी जनजागृती याचा उहापोह पुस्तकात करण्यात आला आहे.



💐अभिनंदन 💐 बर्फी खुप आवडल. छान मार्मिक मार्गदर्शन केले जी की काळाची गरज आहे.जनतेने म्हणजे प्रत्येक आई-बापाने बदलायला हवे. पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

ज्वलंत विषयावरचं,

हृदयाला भिडणारं,
अंतर्मुख करणारं,
विचार करायलाच लावणारं, भेडसावणारं वास्तव...!
संकलन ,लिखाण , मांडणी उत्तमच.
ई- बुक तर एक गोष्ट ( संकल्पना) झाली, ठीक आहे. पुस्तक छापून , प्रसिद्ध करून त्या पुस्तकाचा प्रसार आणि भेडसावणारी समस्या सामान्यांपर्यंत पोहचावी असं वाटतंय.
भेट स्वरूपात देण्यासाठी लोकांनी खरेदी करावी.

हे पुस्तक माझे बंधू

कै. गोरख महादू सानप


यांच्या स्मृतीस

साश्रू नयनांनी अर्पित



खूप अर्ध्यावर सोबत सोडून गेलास मित्रा, अपंग केलंस तू मला, आता आधार कोण देणार मला, आत्ता कुठे काही जबाबदारीतून मुक्त झालो होतो त्यात अजून जबाबदारी माझ्यावर सोडून गेलास. इतके कष्ट करून तू आज सर्वसुखांनी संपन्न झाला होतास, मग का तू मला सोडून गेलास. मला खूप हरवलं तू. आई पप्पा खूप आठवण काढत आहेत. तुझी बायको मुलगा खूप आठवण काढत आहेत. पिल्लू विचारत आहे, नाना कधी येणार मला भेटायला. खूप नाती जपलीस सर्व तुझी आठवण काढत आहेत. कितिरे माणुसकी कमावलिस सर्व तुझी आठवण काढत आहेत.

कै. गोरख महादू सानप वय वर्ष ३०, यांच्या दशक्रिये निमित्त इतर कुठलाही खर्च न करता त्यांच्या अस्थिवर कुटुंबाने पाच प्रकारचे झाडे लावले, त्याचबरोबर स्वयंप्रेरीत सामाजिक संस्था.साई सेवा संघम, रायतेवाडी फाटा, संगमनेर इथे वृक्षरोपण करून अनाथ मुलांना काही शैक्षणिक वस्तू, खाऊ, भोजन देऊन अन्नदान केलं.





बर्फी आणि अंतर्वस्त्र हे लघुपट काही महोत्सवात पाठवले आहेत.




INDIAN FILMMAKERS FILM FESTIVAL
RUNNER UP
INDIAN FILMMAKERS FILM FESTIVAL
BEST FILM EDITING
NOVEMBER 2020 FESTIVAL
CERTIFICATE OF ACHIEVEMENT
This certificate is proudly presented to
ANTARVASTRA
Directed By
Sharad Rajbhoj
For Being The Runner-up Of This Season.
17-11-2020
Date
Signature

# वस्त्र

सीमा बारावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली सर्वसामान्य घरातील मुलगी त्या दिवशी रागारागातच घरात शिरली, कॉलेजची बॅग सोफ्यावर आपटली अन तशीच पुन्हा दरवाज्याच्या दिशेने निघाली.

कायगं, काय झालं इतक्या रागात बॅग टाकून कुठे निघालीस. ‘सीमाच्या आईने विचारलं.’

काहि नाही, आले मी दोन मिनिटात.

सीमा बाहेर जाऊन बाहेरील दोरीवर सुकत असलेले कपडे आत घेऊन आली.

आई, उद्या पासून आपल्या दोघींचे कपडे बाहेर सुकवायला नाही घालायचे. दादाचे आणि पप्पांचे टाकत जा आपल्या दोघींचे घरातच टाकतजा. हवं तर मी जागा करून देते.

अग हो, पण तुला कुणी काही बोललं का? सांगशील तर झालं तरी काय अचानक.

‘कुणी काही बोललं नाही’.

मग, असं अचानक.

आई, मी सांगेल तुला नंतर आता खूप डोकं दुखतंय माझं.

बरं बाई, तू आधी फ्रेश हो मी तुला जेवायला वाढते. तुला जेव्हा मन होईल तेव्हा सांग मला.

हो.

सीमा बाथरूम मधून फ्रेश होऊन बाहेर पडली.

झालं का तुझं, वाढू का जेवायला.

हो, वाढ. मी आलेच तोपर्यंत.

सीमाच्या आईने ताट वाढून घेतलं. सीमा सर्व आवरून ताटावर येऊन बसली.

लोणचं आनू काग तुला.

नको, रिमोट कुठे ठेवलाय.

आगं जेवताना टिव्ही नको बघत जाउ.

सीमाने रागाने आईकडे बघितल.

बरं देते, तू रागावू नकोस आधीच चिडचिड झालीय तुझी आणि त्यात अजून भर नको घालूस. हा घे,
तू जेवण कर तो पर्यंत मी किचन साफ करून घेते.

नको, थांब तू माझं जेवण होई पर्यंत इथेच.

आगं, मी काय करू बसून तू आपली टीव्ही बघणार आणि तशी ही माझी बरीच कांम आहेत मला.

नाही बघत टीव्ही, तू जवळ बसून रहा फक्त.

बरं बरं, अगं नुसतीच काय भाजी-भाजी खातेय भाकर घेना.

नको नको,  मला नुसतीच छान  वाटतेय.
सॉरी आई, मी चिडचिड केली.

अगं सॉरी काय त्यात, होते माणसाची चिडचिड कधीतरी.

पण मी तुला कधी चिडचिड करतांना नाही बघितलं गं.

मला चिडचिड करून कसं चालेल, मग तुझा राग शांत कोण करेल. (हसत)

सीमाही हसत, तू पण ना ग्रेट आहेस बघ.

सीमाच्या आईने  सीमा चा राग अगदी सफाईने दूर केला. आणि अत्ता मूळ मुद्द्यावर येऊन पोहोचली.

पण चिडचिड कशाला करायची?

अगं, होते गं कधी-कधी.

अशी कशी होते, डोकं शांत ठेवायचं आणि चिडचिड होऊ द्यायची नाही.

पण, अगं आता कारणही तसंच होतं.

असं काय कारण होतं? सांग बरं, कि तु इतकी चिडलीस.
अगं काय झालं मी आणि पिंकी कॉलेजमधून येत होतो. पिंकी तिच्या घराकडे वळाली, आणि मी पुढे आले. बाजूच्या उषाकाकूंच्या घराबाहेर त्यांचे कपडे सुकत होते चार-पाच बाजूच्या गल्लीतील मुलं त्यांच्या कपड्यांकडे बघून अश्लील बोलत होते. आणि त्यांना मी याआधीही बघितलंय, असं वागताना.

अगं इतकच ना, मग तू कशाला स्वतःला त्रास करून घेतेस.
असतात अशी काही असंस्कारी मुलं, सोडून द्यायचं.

असं कसं सोडून द्यायचं, मग ते कशेही वागले तर खपवून घ्यायचं का?

मग तू काय करणार आहेस, जाऊन त्यांच्या तोंडी लागणार आहेस का?

मी कशाला अश्या लोकांच्या तोंडाला लागू.

मग देना सोडून.

पण, उद्यापासून आपलया दोघींचे कपडे बाहेर नाही टाकायचे.

अगं, पण घरात इतकी जागा कुठे आहे?

ते मला माहित नाही, तू बाकीचे टाक पण आपले कपडे मी टाकू देणार नाही तुला.
अच्छा ठीक आहे बाबा,  मी ते घरातच सुकवेल मग तर बस्स.

(सीमाच्या आईच्या लक्षात आलं, कि हि चिडचिड का झाली होती)

हो.
सीमा (हात धुवत) छान झाली होती गं भाजी.

आवडली तुला.

हो खूपच, असं वाटतंय कढई चाटून घ्यावी.

बापरे, उद्या पुन्हा करेन तुझ्यासाठी.

मी पण तेच सांगणार होते, उद्या पण अशीच भाजी बनव.

☺☺☺☺

आज सीमा आणि पिंकी कॉलेज सुटल्यानंतर बसस्टॉप वर बसची वाट बघत होत्या. एक माणूस सारखा पिंकी कडे बघत होता ही गोष्ट सीमाला खटकली, पिंकीला बाजूला करत सीमा पिंकीच्या जागेवर उभी राहिली थोड्याच वेळात बस आली. दोघी बसमध्ये चढल्या बसमध्ये गर्दी असल्यामुळे दोघींनाही बसण्यासाठी शीट मिळाली नाही. दोघी उभ्यानेच प्रवास करत होत्या तितक्यात सीमाची नजर पिंकीच्या अंगाला स्पर्श करणाऱ्या एका व्यक्तीकडे जाते. हे तिच्या लक्षात येते की हा जाणूनबुजून पिंकीला स्पर्श करतोय.

पिंकी, जरा पुढे हो आपला स्टॉप येईलच अत्ता.

अग हो, थांब जरा अजून वेळ आहे.

तू ऐकतेस का, नंतर गर्दी झाल्यावर उतरायला त्रास होईल.

बरं बाई चल.

थोड्याच वेळात दोघी त्यांच्या स्टॉपवर उरतात.

कायंग, तुला काही अक्कल आहे का सगळी विकलीस.

आत्ता काय झालं मॅडम

मी मगासपासून बघते स्टँडवर तो माणूस सारखा तुझ्या या कपड्यांकडे  बघत होता, आणि म्हणून मी तुला बाजूला करून तुझ्या जागेवर उभी राहिली नंतर बस मध्ये तर शेजारचा माणूस तुझ्या अंगाला सारखा स्पर्श करत होता, तुला ह्या गोष्टी लक्षात नाही का येत, आणि मुख्य म्हणजे तुला किती वेळा सांगितले की असे अपरे-चीपरे कपडे घालत जाऊ नकोस तुला घरचे कशे काय असले कपडे घालून देतात.

अहो सीमा मॅडम,  लोकांच्या नजरेपाई आपलं स्वतंत्र गमवायचं का?  बघत असतील तर बघू दे आपल्याला काय फरक पडतो राहिला प्रश्न स्पर्श करायचा तर बसमध्ये गर्दी असते, लागतो थोडाफार धक्का मग पुरुष किंवा स्त्री कोणीही असू देत.

सीमा डोक्याला हात लावत.
तुझ्यासारख्या बेअक्कल मुलींमुळेच हे सगळं होतं.

काय? तुला काय म्हणायचं आहे.

कपड्यांजवळ काय आलंय  स्वातंत्र्य, अगं त्यात आपले संस्कार, संस्कृती दिसून येते, आणि तुला माहितीये मी कायम ऐकते, की मुली अशा अपरे-चीपरे कपडे घालतात म्हणूनच असे बलात्कार छेडछाड वगैरे होतात.

सीमा, तु जे ऐकतेसना ते साफ चुकीचं आहे. असं काही नाही त्याला कपडे जबाबदार नसतात. अगं दोन-दोन, तीन-तीन वर्षांच्या मुलींवर बलात्कार होतात त्यांना काय समज असते गं या कपड्यांची, मग का त्या अशा घटनांना बळी पडतात.
कालची बातमी वाचलीस का तू.

नाही काल माझा मूड खराब होता मी काही वाचलं नाही काय होती बातमी.

अंग, एका तेरा वर्षाच्या मुलीवर स्वतःचा भाऊ आणि बाप गेली तीन वर्षे बलात्कार करत होते. मग आता सांग कुठे राहिले तुझे कपडे, संस्कार, संस्कृती.

शी बाई, या लोकांना कशी गं लाज वाटत नाही. स्वतःच्या मुलीवर, स्वतःच्या बहिणीवर ऐकूनच किळस येते, बिचारी ती मुलगी पूर्ण आयुष्य कसं काढणार, तिला क्षणाक्षणाला ही गोष्ट टोचत रहाणार की, आपला भाऊ आणि बापच आपल्याशी असं वागलेत. तर समाजातल्या कुठल्याही पुरुषावर ती कसा विश्वास ठेवणार.

हो खरं आहे तुझं. म्हणून म्हणते कपड्यांवर काही नसतं.

हो तेहि खर आहे. कायगं, का असं घडतं असावं.

याला खूप गोष्टी जबाबदार आहेत. मुख्य म्हणजे कायद्यात असलेल्या पळवाटा, त्या नंतर आजूबाजूचा समाज, हा खूप मोठा विषय आहे आपण नंतर बोलू यावर.
माझं घर आलं. बरं ते जाऊदेत मला सांग तुझा मूड का खराब होता काल.

अगं काय झालं, काल तु गेल्यावर मला पुढे जाताना आमच्या घराआधी एका गल्लीत उषाताई म्हणून आमच्या काकू राहतात त्यांचे आतले कपडे बाहेर सुकत होते. तर चार-पाच मुलं त्या कपड्यांकडे  बघून अश्लील काहीतरी बोलत होते, याआधीहि मी त्यांना असं बोलतांना बघितलं होतं. पण काल मला खूपच राग आला मी तडक घरी जाऊन आमचे सर्व कपडे बाहेर सुकत होते ते घरात आणले. आणि आईला सांगितलं की उद्यापासून आपले कपडे बाहेर सुकवायला नाही टाकायचे .

पिंकी (हसत), माझी मम्मी आमचे आतले कपडे कधीच बाहेर टाकू देत नाही, आम्ही आमचे कपडे घरातच सुकवतो.

कितीगं विचित्रपणा म्हणायचा हा, हे असे लोक यांनाहि घरात आई बहिण असतेचना, अशे चाळे करणाऱ्यांना हे कसं लक्षात येत नाही, की आपण पुरुष जरी असलो तरी आपण एका स्त्रीच्या पोटातून जन्माला आलोय. आपल्याही घरात आपली आई, बहीण असते.

अगं, आपण अश्या समाजात राहतो जिथे पुरुष स्त्रीच्या पोटातून जन्म घेतो तोच मोठा होऊन तिला एखाद्या मंदिरात अपवित्र म्हणून येण्यास प्रतिबंध करतो. कारण तो तर तेव्हा पवित्र झालेला असतो.

बाई, किती विचित्र आहे हे सर्व.

म्हणून म्हणते हा खूप मोठा विषय आहे बोलायला गेलं तर चार दिवस पण कमी पडतील.

पण हे किती दिवस असं चालणार.

पुढच्या आठवड्यात पेपर आहेत आपले त्यावर लक्ष दे, या गोष्टींवर लक्ष देत बसू नकोस.

पण मग हे असंच चालत राहणार कागं.

नाहींग, घडेल बदल कधीतरी.

कारण काही गोष्टी खूप प्रायव्हेट करून घेतल्यात लोकांनी आणि तसं चित्र त्यांच्या मनात पक्क छापलं गेलंय, तू पीके चित्रपट बघितला का?

हो कागं.

मग त्यात बघ, एका माणसाच्या खिशातून कंडोमचं पॉकेट पडतं, तर अमीर खान ते पॉकेट उचलून जेव्हा त्या व्यक्तीला सांगतो हे तुमचं आहे तुमच्या खिशातून पडलंय. ती व्यक्ती पुढे येते द्यायला पण जेव्हा त्याच्या लक्षात येत कि हे कंडोमचं पॉकेट आहे. मग ती व्यक्ती लगेच बोलते नाही-नाही हे माझं नाही. मग तो चार-पाच जणांना विचारतो हे तुमचं आहे का? सर्वजण नाही बोलतात. त्याच ठिकाणी पैशे किंवा दुसरी काही वस्तू असती तर प्रथम तो माणूसच हो माझीच म्हटला असता पण ती प्रायव्हेट बाब झाली साहजिकच माणूस लाजणार.

होगं, अशीच एक घटना मीही अनुभवली आहे.

कायगं,

अगं आम्ही तळ मजल्याला राहतो आमची सहा माळ्याची बिल्डिंग आहे आणि आमच्या घरासमोर काही दुकानं आहेत. म्हणून तिथे कायम वर्दळ असते त्या दिवशी काय झालं मी खिडकीत केस विंचरत होते अचानक माझ्या डोळ्यासमोरून काहीतरी खाली पडलं आणि आवाज आला म्हणून मी बाहेर डोकावून बघितलं तर वरून कोणीतरी कपडे सुकवायला टाकत असतांना त्यांची ब्रा खाली पडली होती. मला वाटलं पडली असेल कुणाचीतरी घेऊन जातील. त्यानंतर मी सर्व तयारी केली, चहा नाश्ता झाला पुन्हा खिडकीत तुझ्याशी फोनवर बोलत-बोलत आले, तर बघितलं ती ब्रा

तशीच पडून होती कोणीही ती न्यायला आलं नव्हतं. थोड्या वेळाने कचरेवाला आला आणि त्याने ती उचलून कचऱ्यात टाकून घेऊन गेला.

मग बघ, तशीच पीके सारखी घटना आहे कि नाही, ती वेगळी होती पण या गोष्टीलाही आपणच एक प्रायव्हेट बाब करून ठेवलं आहे. मध्यंतरी तुला माहितीये एक अभिनेत्री तिच्या स्तनांवरून ट्रोल झाली होती. तर तिने काय छान उत्तर दिलं होतं.

कायगं?

स्तन हा माझ्या शरीराचा भाग आहे. मग तो किती दाखवायचा हा माझा प्रश्न आहे. तर त्यावरूनही तिच्यावर अनेक टीका झाली होती. काय वाईट बोलली होती ती. पण, समाजाने टीका केलीच ना.
मध्यंतरी एका मासिकाच्या कव्हरवर आपल्या बाळाला स्तनपान करणारी एक स्त्री दाखवली होती. तर त्या मासिकावरहि टीका झाली होती. आता मला सांग स्तनपान करताना तरी काय टीका करायची मग टीका करणारे हे का लक्षात घेत नाहीत की, ही एक नैसर्गिक बाब आहे. पण समाजाने या गोष्टींना अधिकच महत्त्व दिलं आहे.
जाऊदेत खरच खूप मोठा विषय आहे हा, आपण नंतर बोलू चल मी जाते आता, तुहि जा आणि जास्त विचार करू नकोस अभ्यासावर लक्ष दे.

हो बाई,

अगं हो, तू त्या नोट्स देणार होती मला.

अरे यार, विसरलीच मी उद्या नक्की आणते चल बाय!

बाय-बाय!

☺☺☺☺

त्या दिवशी सीमा आणि पिंकी कॉलेजमधून सुटल्या होत्या बस स्टॉप वर बराच वेळ झाला काही प्रॉब्लेम असल्यामुळे बस येत नव्हती. तितक्यात सीमाचा फोन वाजतो.

सीमा:- हॅलो!

अगं आई बोलते, कुठे आहेस.

आई मी आणि पिंकी कधीची बस स्टॉपला उभ्या आहोत, पण बसचं आली नाही.

अगं नाक्यावर कसलातरी मोर्चा आलाय बस उशिरा येईल मी आत्ताच बातम्यांना बघितलं. म्हणून फोन केला तुम्ही पाई निघून या, बसची वाट पाहू नका, चालत तुम्ही लवकर पोहचाल घरी.

शी बाई, आधीच कंटाळा आलाय त्यात पाई चालायचं ठीक आहे येतो आम्ही.

हो हो, बाय जपून या.

(पिंकी सिमला विचारते)
कायगं, कोणाचा फोन होता. आणि पाई चालायचं काय?

अगं आईचा फोन होता ती म्हणत होती नाक्यावर कसलातरी मोर्चा आलाय म्हणून बस उशिरा धावत आहे.

मग आता?

मग काय, जाऊयात गप्पा मारत-मारत.

किती मज्जा येईल खूप दिवस झालेत आपण चालत गेलोच नाही.

तुला काय मजा वाटते माहित नाही माझ्या तर जीवावर आलंय  चालायचं.

चलगं,  तुला आठवतंय आपण लास्ट टाईम चालत गेलो होतो तेव्हा एका ठिकाणी पाणीपुरी खाल्ली होती.  काय मस्त होतीना.

मग त्याचा काय संबंध इथं.

अगं वेडे, चालत जायचं तर पुन्हा एकदा खाऊन जाऊना.

(सीमा थोडी हसत)
तू पन्ना खाण्याशिवाय दुसरं काही सुचतं कागं बाई तुला.

बरच काही सुचतं सांगू....

नको-नको बाई, आधीच मला कंटाळा आलाय.

म्हणजे तुला काय म्हणायचंय मी बोर करतेय तुला.

नाहीगं, पण मला काहीच ऐकायची इच्छा नाही आज.

ओके मॅडम, तुम्ही चला तर मी तुमचा मूड फ्रेश करते.

चल बाई.

दोघी थोड्या चालत-चालत पुढे जातात एक लेडीज इनर वेअर च्या दुकानाबाहेर एक माणूस बाहेर लावलेल्या काही कपड्यांकडे विचित्र नजरेने बघताना सिमला दिसतो.

ये सीमा, बघ किती गर्दी आहे त्या पाणीपुरीवाल्याकडे.

सीमा तिच्याच विचारात गुंतलेली

कायगं आता काय झालं.

काही नाही.

मी तुला आजच ओळखते का? खरं सांग मला काय झालं ते.

तू आता एक गोष्ट बघितलीस का?

नाही.

म्हणून म्हणते खाण्याशिवाय तुला दुसरं काहीच दिसत नाही.

म्हणजे!

म्हणजे काय, मगाशी तो माणूस कसा टक लावून बघत होता त्या कपड्यांकडे.

तुझं फालतू गोष्टींकडे अधिक लक्ष असतं,

तुला काय म्हणायचं आहे.

अगं जीवनात काही क्षण येतात त्यांची मजा घ्यायची, आपलं काय ठरलं होतं, पण तू मध्येच या किरकोळ गोष्टींकडे लक्ष देते आणि सारा मूड खराब करतेस बघ.

तुला ही किरकोळ गोष्ट वाटतं असेल, पण मला नाही.

तुला पाणीपुरी खायची आहे की नाही सीमा?

(सिमाला कळून चुकलं पिंकी आता चिडली)

बरं चल, ये पण एकच प्लेट घेऊया मला जास्त नाही खायची, मी खाल्ली तर एखादीच खाईन.

मला बाकी माहित नाही मला तर पूर्ण प्लेट खायची आहे. तू तुझं बघ.

बरं बाई, तू काय ऐकणार आहेस का माझं.

हे तर चांगलं माहित आहेना तुला.

हो-हो चांगलंच माहित आहे.

(पिंकी) भैय्या दो प्लेट पाणीपुरी देना, एक तिखा रहेगा और एक मिडीयम.

ठीक हैं ताई!

दोघी पाणीपुरी खाऊन पुन्हा घराच्या दिशेने निघतात.

(सीमाच्या डोक्यात अजून तोच विचार चालू होता)
पण मला ती गोष्ट खूपच खटकलीगं.

ये, जाऊदेगं, पहिले तू सांग तुला पाणीपुरी आवडली का?

हो, (सीमा मात्र त्या विचारातून बाहेर यायला मागत नव्हती.) पण मी काय म्हणते तुला.........,

आत्ता तरी काहीच म्हणू नकोस.
(शेवटी अशीतशी पिंकीने सीमाची बोलती बंद करून घर गाठलं)

(सीमा घरी पोहचते, तिचा पडलेला चेहरा पाहून आईला वाटते कि आज चालत आल्यामुळे ही थकली असेल खूप)

थकलीस कागं, फ्रेश हो मी जेवायला वाढते.

नको आई मी रस्त्याने येताना पाणीपुरी खाल्ली आहे. त्यामुळे मला भूक नाहीये.

फक्त पाणीपुरीने काय होतं.

(सीमा रागात) आई, तुला बोलले ना एकदा..

बरं बाई.
(आईला खात्री झाली की आज पुन्हा काहीतरी घडलं. सीमा फ्रेश होऊन बेडरूममध्ये जाऊन टेबलावर डोकं ठेवून विचार करत बसते. तितक्यात आई किचन मध्ये जाऊन कॉफी बनवून आणते)

सीमा बेटा हि जराशी कॉफी घे, तुझा थकवा दूर होईल.

ठेव तिकडं,

नाही थंड होईल तू आधी पिऊन घे.

(सीमा रागाने आईकडे बघत)
आण बाई, तू काय सोडणार आहेस मला.

(सीमा कॉफी पित असते, सीमांचे दोन तीन घोट पिऊन झाल्यावर आई थोड्या दबक्या आवाजात)

कायगं, आज काय झालं पुन्हा.

काही नाहीगं, दुपारी आम्ही येत होतो, तर रस्त्यात लेडीज कपड्यांच्या दुकानापुढे एक माणूस एकटक त्या कपड्यांकडे बघत होता. मला खूप वाईट वाटलं ते बघून किती विचित्र लोक असतातगं आई, कपडे सुद्धा सोडत नाहीत.

सीमा सर्व दुनियाच टेन्शन तूच घेशील का?

(आज आई चिडली होती)

नाहीगं आई, पण मला नाही सहन होत हे सर्व.

मग आता काय करायचं?

मग असं शांत बसायचं का?

पण मग तू काय करणार आहेस.

मी ठरवलंय, उद्यापासून असं कोणी दिसलंना त्याची तिथेच गच्ची पकडून जाब विचारायचा.

ये पोरी, असं काही पण करू नकोस. आपण सर्वसामान्य माणसं उगाच काही वाढवा झालं, तर तुझे पप्पा तुला आणि मलाही सोडणार नाहीत.

(सीमाच्या डोळ्यात पाणी येतं)

आई तु जागं जरा वेळ बाहेर, मला जरा आराम करू देत. मी काही नाही करत. पण तू थोडावेळ बाहेर जा.

कसं काय करू बाई या मुलीचं शुल्लक गोष्टी मनावर घेऊन स्वतःला त्रास करुन घेते ही मुलगी, हिच्या एकटीने काही होणार आहे का?

(दुसऱ्या दिवशी सीमा फ्रेश होऊन बाथरूम मधून बाहेर पडली)

कायगं पोरी आवरलं नाहीका अजून, वेळ झालाय. (सीमाला आईने विचारलं)

अगं हो, आवरलंय पण..(थोडा पडका चेहरा)

पण काय आता.

काही नाही तुला नंतर सांगेल.
(सीमांचे वडील समोर पेपर वाचत बसले होते. सीमाची आणि त्यांची हे शब्द ऐकताच नजरेला नजर मिळते. त्यांना वाटतं मुलीला काही प्रॉब्लेम आईलाच सांगायचा असेल)

(सीमा चे वडील पेपर बाजूला ठेवत)
कल्पना मी जरा बाहेर जाऊन आलो. अण्णांची तब्येत ठीक नाहीये जरा विचारपूस करूनही येतो.

हो या जाऊन.

(ते बाहेर पडताच) कायगं सीमा काय झालं.

अगं रात्रीपासून माझ्या अंगाला खूप खाज येतेय, आणि जखम झाल्यासारखं वाटतंय.

अगं होतं कधीकधी, काहीतरी हात लागला असेल. एक काम कर जरा पावडर लाव बरं वाटेल बघ तुला.

हो चालेल. (नाश्ता वगैरे करून सीमा कॉलेजला निघून जाते)

(दुपारी आई सीमाला फोन करते)
कायगं सीमा बरं वाटतंय ना तुला.

नाहींग खूपच त्रास होतोय काहीच सुचत नाही.

बरं तू घरी ये लवकर मी बघते.

हो मी विचारते सरांना, कारण मला बसवत नाही.

ये पिंकी मी आज लवकर जाते घरी, माझी तब्यत बरी नाही.

हो ते कळलं मला. चल आपण विचारू सरांना मी पण येते तुझ्याबरोबर.

नाही नको तू थांब, आज महत्वाचा लेक्चर आहे, संध्याकाळी मी नोट्स न्यायला येईल तुझ्याकडे.

बरं सांभाळून जा मग.

हो-हो

(सीमा घरी येईपर्यंत आई डॉक्टरांची अपॉइंटमेंट घेऊन ठेवते. थोड्या वेळाने सीमा घरी पोहचते)

अगं आलीस का, बर लवकर फ्रेश हो, मी तुझासाठी चहा ठेवते. पाच वाजताची अपॉइंटमेंट घेतलीय मी डॉक्टरांची, अजून दीड तास आहे आपल्याकडे.

हो आवरते, मलाच असं झालंय की मी कधी एकदाची डॉक्टर कडे जातेय.

मी तोपर्यंत तुझ्या पप्पांना फोन करून सांगते, आम्ही जरा बाहेर जातोय उशीर होईल येताना बाहेरून चहा पिऊन या त्यांना चहा शिवाय जमत नाही.

हो-हो.

(दोघी सर्व आवरून क्लिनिकला जायला निघतात. क्लिनिकमध्ये पोहोचल्यावर डॉक्टर सीमाला चेक करतात)

(डॉक्टर)
अहो काही काळजी करण्यासारखं नाही. फंगल इन्फेक्शन आहे. या दिवसात होतं असं, मी काही औषधं लिहून देते त्याचबरोबर मलम, साबण आणि पावडरही देते. उद्याच तुला थोडा फरक जाणवेल आणि एक-दीड महिन्यात सर्व जखम बरीं होईल.

(सीमाची आई)

पण डॉक्टर हे असं अचानक कशा मुळे?

अहो म्हटलंना, होत असं कधीतरी त्यात आता पावसाळा चालू आहे. थोडेफार ओलसर कपडे घातले गेले असतील.

मी काही औषध देते ते वेळेवर घ्या बरं वाटेल. आणि महत्वाचं टॉवेल वेगळा वापरत जा सीमाचा, आणि तिने वापरलेला टॉवेल कुणीही घरात वापरू नका आणि सर्व कपडे उन्हात सुकवत जा.

(सीमा) हो, आम्ही सुकवतो सर्व.

नाही डॉक्टर आमचे अंतर्वस्त्र सध्या आम्ही घरातच सुकवतो.

असं का?

अहो एक दिवस हि रागारागात सर्व कपडे घरात घेऊन आली आणि म्हटली की उद्यापासून आपले कपडे बाहेर सुकवायला टाकायचे नाहीत.

पण असं का?

तिने त्या दिवशी बघितल की चार-पाच मुलं शेजारच्या उषाकाकूंच्या बाहेर टाकलेल्या कपड्यांकडे बघून अश्लील काहीतरी बोलत होते. म्हणून तिला वाटतं कि आपलेही कपडे बाहेर टाकू नये.

(डॉक्टर हसत) अगं बेटा,  त्यात काय झालं आपण या गोष्टींना जास्त महत्त्व नाही द्यायचं ही ज्याची त्याची नजर असते नजर म्हणण्यापेक्षा संस्कार असतात.  ती अशी वागणारी मुलं असंस्कारी असतात. म्हणून मग त्यांचा त्रास आपण स्वतःला का करून घ्यायचा. अशा लोकांना अधिक महत्त्व नाही द्यायचं.

पण डॉक्टर...

पण बिन काही नाही, तू समजदार मुलगी आहेस मला माहित आहे.

डॉक्टर, मी समजदार आहे म्हणून तर हे समजतेना. ठीक आहे मी तुम्ही सांगितलेल्या गोष्टींची काळजी घेईल.

(आई) बरं डॉक्टर आम्ही निघतो.

हो हो,  पुन्हा पंधरा दिवसांनी दाखवून जा.

हो नक्की!

सीमा आई सोबत बाहेर येते. जिन्यावरून खाली उतरत असतांना सीमाच लक्ष सहज एका कोपऱ्यात जात. तिथे गणपतीचा फोटो लावलेला असतो. दुसऱ्या कोपऱ्यात शंकराचा फोटो लावलेला ती बघते. आणि वर लिहिलेलं असतं, देवाला तरी घाबरा येथे थुंकू नका.
पुढे आल्यावर बघते तर काय जिथे देवांचा फोटो लावलेला नसतो तिकडे लोक पान, गुटखा खाऊन थुंकलेले असतात. सीमा घरी येईपर्यंत हाच विचार करत असते असं का?

(रात्री जेवायला सर्व एकत्र बसतात)
(सीमांचे वडील) कल्पना, काय म्हटल्या डॉक्टर.

काही घाबरायचं काम नाही. औषधं दिलीत, पंधरा दिवसांनी पुन्हा एकदा चेक करायला बोलावलं आहे.

(सीमांचे वडील सीमेकडे बघत)
कायगं, जेवण करून औषधं घे, आणि आज जागरण करू नको. सकाळी लवकर उठ हवंतर अभ्यासाला.

हो पप्पा.

सीमा सर्व आवरून बेडरूममध्ये विचारतच पडलेली असते असं का घडतं? काय करू शकते मी याविरुद्ध याच विचारात असतांना अचानक तिला एक कल्पना सुचते आणि तिला खूप आनंद होतो.
आता उद्याच मी हे करून बघते. आणि घाई-घाई उठून कंम्प्युटरवर काहीतरी उद्याची तयारी करत बसते.

☺☺☺☺

(आज सकाळी सकाळी सीमाचा चेहरा जरा हसरा असतो)

(आई) कायगं सीमा, आज खूपच खूश दिसते.

काही नाहीगं.

ते जाऊदे तुला काही बरं वाटलं का?

हो थोडा फरक जाणवतोय.

(नाश्ता वैगेरे आवरून सीमा कॉलेजला निघून जाते)

☺☺☺☺

(कॉलेज सुटल्यावर)

ये पिंकी, आज मला पाणीपुरी खायची खूप इच्छा झालीय.

तुझी इच्छा झालीयना मग खाऊ की, सांग कुठे जायचं?

अगं आपण लास्ट टाईम चालत गेलो तेव्हा खाली ना, तिथेच जाऊ तुला खूप आवड्तेना तिकडची पाणीपुरी.

हो मग प्रश्नच नाही. अरे वा! तुला पण खुपच आवडलेली दिसते.

होगं.

(दोघी घराच्या दिशेने पायी चालत निघतात रस्त्यात जाताना झेरॉक्स दुकान लागतं)

पिंकी जरा थांब मला प्रिंट काढायच्या आहेत.

कसल्या प्रिंट काढतेस.

अगं पप्पांच्या कामाच्या आहेत कसल्या तरी, तू थांब इकडेच.

बरंबरं घे काढून.

(सीमा प्रिंट काढून बाहेर येते)

चल झाल्या.

चल बाई लवकर मला तर असं झालाय कधी पाणीपुरी खातेय.

हो मलाही.

पिंकी तू जरा थांब मी आलेच.

आता कुठे चाललीस.

अगं इथे जरा एक काम आहे.

अगं चाललंय तरी काय तूझं.

काहीनाहींग तू थांब इथेच, मी यु गेले आणि यु आले.

हो जा, मी थांबते इकडेच.

(सीमा लेडीजकपड्यांच्या दुकानात जाते. तेथील लेडीज कर्मचारी सोबत काहीतरी चर्चा करून तिच्या हातात एक प्रिंट घेऊन बाहेर पडते)

चलगं झालं.

नक्की, अजून काही राहिलंय का बाकी.

नाहीगं, झालं सर्व चाल लवकर मला खूप भूक लागलीय.

(दोघीही पाणीपुरी खाऊन घराकडे निघतात पुढे आल्यावर)

(सीमा) चलगं, बाय! भेटू उद्या पुन्हा.

हो, हो, बाय, बाय!

(पुढे आल्यावर सीमा, उषाताई ज्या ठिकाणी कपडे सुकवतात त्या जागेवर एक प्रिंट चिटकवते. नेहमी अश्लील बोलणारे ते चार-पाच मुलं हे बघतात. सीमा थोडी पुढे जाताच ते मुलं तो पोस्टर बघतात. सीमा मागे वळून दोन मिनिटे उभी राहते. ते चार-पाच मुलं सीमाकडे बघत कानाला हात लावून सॉरी म्हणत माना खाली घालून तिकडनं निघून जातात)

☺☺☺☺

(दुसऱ्या दिवशी सीमा सकाळी लवकर उठली, सर्व आवरून कॉलेजला निघायच्या तयारीत)

आई आज आपले सर्व कपडे बाहेर टाक सुकायला.

(आई आनंदात) कायगं, काय झालं असं अचानक.

काही नाही! डॉक्टरांनी सांगितलं आहेना मग, ऐकायला नको का त्यांचं.

बरं बाई नाश्ता करून घे.

(सर्व आवरून सीमा कॉलेजला निघते रस्त्यात जाता-जाता)

ये पिंकी, आजही येताना आपण पाणीपुरी खायला जाऊयात कागं.

बापरे तुला तर चटकच लागली वाटत आता.

असं समज हवं तर.

बरं बाई, आधी कॉलेजला तर जाऊ.

हो नक्की.

(कॉलेज सुटल्यावर दोघी घरच्या दिशेने आजही पायी चालत निघतात. मध्येच ते कपड्याच दुकान लागतं)

ये पिंकी, थांब जरा मी आलेच.

ये बाई, मी दरवेळेस बाहेर नाही थांबणार, आणि असंही मला बघायचं आहे रोजरोज काय काम असतं तुझं.

बरं बाई चल.
(दोघी दुकानात घुसतात)
(सिमाला बघून तिथली महिला कर्मचारी)
नमस्कार मॅडम,आमच्या मालकीण काल खूप खुश झाल्यात. त्यांनी मला म्हटलंय की त्या मुलीला मला भेटायचं आहे.
ती पुन्हा आलीच तर, तिला माझ्या वेळेत दुकानात यायला जमेल का विचार. नसेल जमत तर तिचा नंबर आणि पत्ता घेऊन ठेवा. खूपच छान कल्पना मांडलीय तिने. आणि तुम्हाला सांगू का मॅडम कालपासून आम्ही बघतोय इकडे कुणी पुरुषाची चुकून हि नजर पडली तरी तेपण बिचारे मान खाली घालून निघून जातात.

(सीमाला हे ऐकून खूपच आनंद होतो)

कधी येतील तुमच्या मॅडम.

आज त्या रात्री आठ ते नऊ दरम्यान येतील दुकानात.

होपण, त्या वेळेत मला शक्य नाही भेटणं.

ठीक आहे तुमच्या डिटेल्स देऊन ठेवा.

(सर्व बोलणं आटोपल्यावर सीमा आणि पिंकी दुकानाच्या बाहेर येतात)

कायगं, सीमे काय प्रकार आहे हा सर्व.

कळेलगं तुला लवकरच, तुला पाणीपुरी खायची आहे ना चल मग लवकर.

हो पण काय आहे हे सर्व, मला आधी सांग नाहीतर मी नाही येत, जा तू एकटीच.

बरं चल तू आधी,  घरी गेली गेल्या सांगते तुला.
(पाणीपुरी खाऊन दोघी घराकडे चालू लागतात रस्त्याने त्याच दिवशीचे अश्लील बोलणारे ती चार-पाच मुलं समोरून येत असतात. त्यांची आणि सीमाची नजरेला नजर मिळते सर्वजण माना खाली घालतात. त्यातला एक जण)

स्वारी दीदी, आमची चूक झाली. पुन्हा नाही होणार असं.

(सीमा थोडासा हसरा चेहरा करत)
ठीक आहेना, तुम्हाला तुमची चूक समजली, त्याचा आनंद आहे मला.

(पिंकी हा सर्व प्रकार बघून अजूनच गोंधळात पडते)

(घरी पोहोचल्यावर)

आई:- कायगं पिंकी,  आज खूप दिवसातून कशी आहेस तू, आणि मम्मी पप्पा कशे आहेत.

पिंकी:- एकदम मजेत काकी,
आणि तुम्ही?

आई:- मजेत सर्व फक्त तुझ्या मैत्रिणीच कधी कधी काय चाललेलं असत काही समजत नाही.

पिंकी:- हो मलाही नाही कळत काकी, बघाना आज दोन घटना घडल्या पण ती मला काही सांगायलाच तयार नाही.

आई:- कायग सीमा, काय बोलतेय पिंकी

सीमा:- थांबा थांबा सांगते.

आई:- बाजूच्या काकी पण आज मला हाताने इशारा करत म्हणत होत्या कल्पनाताई छान डोकं चालवलं तुम्ही. आणि दोन दिवसांपासून सीमापण खूप आनंदात असते.

पिंकी:-  काकी हा काय प्रकार आहे हे कळायलाच मार्ग नाही. आणि ही पण काही सांगायला तयार नाही. ते गल्लीतले मुलं पण हिला सॉरी दीदी म्हणत होते. त्या कपड्याच्या दुकानातील लोकंही हीच कौतुक करत होते. आता येथे येऊन आणखीनच काहीतरी ऐकतेय.

सीमा:- अगं बायांनो माझ्या डोक्यात एक कल्पना आली, आणि ती मी प्रत्यक्षात आणली, तर त्याचे सकारात्मक परिणाम मला दिसले.

पिंकी:- ते कशे?

आई :- हो कशे?

सीमा:– अगं पिंकी, बघ दुपारी त्या दुकानात घडलेली घटना त्यानंतर, त्या मुलांचं वागणं.

पिंकी:- हो, पण असं काय केलंस तू.

सीमा:- या तुम्हाला गंमत दाखवते.

(सीमा दोघींना घेऊन त्यांच्या घरातील कपडे जिथे सुकवायला टाकतात त्या ठिकाणी घेऊन जाते)

सीमा:- (पोस्टर कडे हात दाखवत) हे बघा.

(पिंकी आणि आई हसत सीमाकडे बघतात)

पिंकी:- बाई ग्रेट आहेस तू मानलं मी तुला.


आई:- खरंच ग्रेट आहेस बाई.

पोस्टर_असा होता.

**" येथे सुकत असलेले कपडे आपल्या आई, बहीण, किंवा आपल्या घरातील स्त्रीयांप्रमाणेच आहेत. असं समजा "**

# स्त्रियांची अंतर्वस्त्रे उघड्यावर वाळत घालणे चुकीचे आहे का?

Max Maharashtra | 28 July 2020 9:13 PM





हल्ली एक काका सोशल मिडियावर स्त्रियांबद्दल जे मनाला येईल ते बोलत आहेत. स्त्रीचं वागण कसं असावं, स्त्रीने कसे कपडे घालावे, स्त्रीने रस्त्यावर नाचणे कसे चुकीचे... इतकचं काय तर स्त्रीने तिची अंतर्वस्त्रे Woman underwear उघड्यावर वाळत घालणे कसे चुकीचे ह्यावरही बोलण्यापासून काका स्वत:ला अडवू शकत नाहीयेत.. !

स्त्रियांच्या उघड्यावर वाळत घातलेल्या अंतर्वस्त्रांचा Woman underwear काकांना प्रचंड प्रॉब्लेम आहे. का तर म्हणे, अशी उघड्यावर लटकलेली स्त्री ची अंतर्वस्त्रे पाहून पुरूषांच्या भावना men sexual Feelings rise उफाळू शकतात. का ओ काका? पुरूषांच्या वेगवेगळ्या शेपच्या, डिझाईनच्या अंडरपॅट, बनियन्स उघड्यावरच वाळत असतात की वाऱ्यावर झुलत... ते पाहून स्त्रियांच्या भावना बऱ्या चाळवत नाहीत ते?

श्री गणेश विमल महादू सानप यांची यापुर्वी प्रसिद्ध पुस्तके

कव्हरवर एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.



समाप्त

## ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्षं.

## गणेश सानप यांचं ई साहित्यवरचं हे तिसरं पुस्तक.

गणेश विमल महादू सानप आपल्या नावात आईअचं नाव लावतात. इथूनच त्यांच्या समाजिक जाणीवा आणि महिलांविषयीचा त्यांचा निरोगी दृष्टीकोन स्पष्ट होतो. आपल्या लेखन व लघुपटांतून ते समाजातील स्त्रीविषयक रोगट विचारांवर प्रहार करतात. तरुणांमध्ये निकोप विचार जागे व्हावेत यासाठी ते प्रयत्नशील आहेत. आणि हे काम करताना ते रटाळ उपदेश करत नाहीत तर मनोरंजक कथा, पटकथांचा वापर करतात. वाचक त्यांची पुस्त्रकं वाचताना एकीकडे मजा घेतात तर दुसरीकडे त्यांच्या सामाजिक जाणिवा समृद्ध होत जातात.

गणेस सानप यांच्यासारखे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज

गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?